# अशासकीय विधेयके व ठराव समिती (विधानपरिषद)

महाराष्ट्र विधानपरिषद नियम २०१ (१) अन्वये दरवर्षी विधानपरिषदेच्या पहिल्या अधिवेशनास प्रारंभ झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर मा.सभापती अशासकीय विधेयके व ठराव समिती गठित करतात. समितीत एकूण सात सदस्य असतात व मा.उप सभापती हे या समितीचे समिती प्रमुख असतात. समितीचे सदस्य नवीन समितीची रचना होईपर्यन्त पद धारण करतात.

बॅलटद्वारे काढण्यात आलेली अशासकीय विधेयके सभागृहात विचारार्थ घेण्यापूर्वी त्यांचे स्वरुप, महत्व व निकड यादृष्टीने छाननी करुन त्यांचे वर्गीकरण करणे व त्यानुसार प्रत्येक विधेयकास चर्चेत द्यावयाच्या वेळेबाबत कालमर्यादा ठरविणे. त्याचप्रमाणे बॅलटमध्ये आलेल्या अशासकीय ठरावांच्या बाबतीत देखील ठरावाचा विषय, त्याचे स्वरुप व महत्व इत्यादी बाबी विचरात घेवून त्यानुसार ठरावांना चर्चेसाठी वेळ ठरवून देणे ही कामे या समितीद्वारे करण्यात येतात. तसेच मा.सभापती वेळोवेळी अशासकीय विधेयके व ठराव याबाबत इतर जी कामे नेमून देतील ती कामे देखील ही समिती पार पाडते.

अशासकीय कामकाजासाठी शुक्रवार हा दिवस नेमून दिलेला असल्याने त्या दिवशी चर्चेला घेण्यात येणाऱ्या अशासकीय विधेयके किंवा अशासकीय ठराव यांना चर्चेसाठी द्यावयाचा वेळ ठरविण्यासाठी समितीची बैठक एक दिवस अगोदर म्हणजे गुरुवारी घेण्यात येते. बैठकीत ज्याप्रमाणे वेळेचे वाटप केले असेल त्याप्रमाणे समिती अहवाल सभागृहात सादर करुन त्यास सभागृहाची मान्यता मिळविते.

# सदस्यांची सूची

**समिति प्रमुख**

डॉ.नीलम गोऱ्हे, उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद.

**सदस्य**

१. श्री.विलास पोतनीस, वि.प.स.

२. श्री.अभिजीत वंजारी, वि.प.स.

३. श्री.प्रविण पोटे-पाटील, वि.प.स.

४. रिक्त

५. रिक्त

६. रिक्त

******